# उद्योगातील प्रेझेंटेशनचे महत्त्व

## भाग २ – उद्योजकाचे वक्तृत्व व संभाषण कौशल्य

– पद्मश्री राव
pr.thewriter@gmail.com.

'आज मी....', 'आज माझ्याकडे...', 'आज माझ्यासोबत....', 'आज माझ्याबद्दल....' 'मी.....'

आपण एक कर्तृत्ववान व्यक्ती म्हणून समाजापुढे उभे राहताना आणि आजवर केलेल्या प्रवासातून समोरच्या श्रोत्यांपर्यंत काही पोहोचविताना कसे बोलतो? आपल्या भाषणाने, संभाषणाने, वक्तृत्वाने श्रोता मोहित होतो, प्रेरित होतो, आपल्यामध्ये त्याची भावी छबी शोधण्याचा प्रयत्न करतो, आपल्याशी हात मिळवताना थोडेफार तरी नशीब आपल्यासारखे लाभेल याची भाबडी आस ठेवतो.. त्याला आपल्यासारखं व्हायचं असतं...तेव्हा एक वक्ता म्हणून आपली जबाबदारी नाही का वाढत? म्हणूनच हा प्रयास आहे 'मी' शोधण्याचा...

अपार मेहनत घेऊन, धडपड करून जीवनाच्या एका क्षणी आपण उद्योजक म्हणून नावारूपाला येतो. आजच्या पिढीकडे पाहताना आपल्या तेजीने, इंटरनेटच्या माध्यमातून जवळ आलेल्या जगाचा बिनधास्तपणे सामना करून विविध स्तरावर, मंचांवर आज तरुण उद्योजक दिसू



लागले आहेत. उद्योजकतेचे बाळकडू देण्यासाठी अलम दुनिया तयार आहे फक्त आपल्याला ते योग्य पद्धतीने घेता आले पाहिजे. आज उद्योजक होणे म्हणजे 'उद्योगात पडणे' नसून 'उद्योग सुरु करणे'. नोकरीचा भरवसा नसल्याने व्यापाराच्या मार्गावर उमेदीने सरसावलेले अनेक तरुण उद्योजक, रिटायरमेंट नंतर शांत बसवत नाही असे अनेक सिनियर सिटीझन, घरबसल्या वेळेचा सदुपयोग करायचा विचार करणाऱ्या गृहिणी, अनेक बचत गट आणि अगदी प्रत्येक होतकरू व्यक्ती आज उद्योजकतेकडे वळत आहे. अशावेळी अनेक 'उन्हाळे-पावसाळे' पाहिलेले, उद्योजक होण्यासाठी मार्गदर्शन शिबीर चालविणारे, अनेक संस्था, मंचांमधून कार्यशाळा घडवून आणणारे, पुस्तके काढणारे, लेख प्रसिद्ध करणारे, या उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांना तयार करण्यासाठी आणि कधी कधी आपलाही उद्योग वाढविण्यासाठी तत्पर असतात.

या सगळ्यातून फायदा होतो तो प्रत्येक व्यक्तीला. येणाऱ्या श्रोत्याला आणि वक्त्यालासुद्धा.

### श्रोता तुमचा 'ब्रँड अम्बेसेडर':

आपला श्रोतावर्ग हाच आपला 'ब्रँड अम्बेसेडर' असतो. यशस्वी उद्योजक, वक्ता म्हणून आपल्याला विविध संस्थांमार्फत कार्यशाळा, शिबीर यासाठी बोलाविले जाते. आपल्या वक्तृत्वाने प्रेरित झालेला हाच श्रोतावर्ग, संस्था पुनश्च तुमच्यापर्यंत पोहोचतात. आपल्या मेहनतीने आपण आपल्या व्यवसायाची प्रतिमा उंचावलेली असतेच सोबत आपल्या वक्तृत्वाने, तळमळीच्या बोलण्याने तयार झालेली कर्तृत्ववान उद्योजकाची प्रतिमादेखील हाच श्रोता समाजात प्रसिद्ध करतो. त्यामुळेच जसे 'अतिथी देवो भव' तसेच 'श्रोता देवो भव' असे प्रत्येक वक्त्याने मानणे खूप महत्वाचे आहे.

### उद्योजक की वक्ता?

आपला उद्योग-व्यवसाय बोलका आहे. व्यवसायाचा विस्तार, त्याची सामाजिक प्रतिमा, आपली स्वतःची एक उद्योजक म्हणून प्रतिमा, राज्य आणि जागतिक स्तरावर होणारी आपली ओळख हे आपले ध्येय, आपले स्वप्न आहे. पण मी वक्ता कसा/कशी होऊ? मला नाही बोलता येत. फारफार तर माझ्या व्यवसायाशी निगडीत, माझ्या प्रवासाशी निगडीत मी बोलू शकतो. पण बाकी मला काही जमणार नाही अशी बहुतेकांची समजूत असते.

### येणारा श्रोता तुमच्याकडून एक वक्ता म्हणून काय अपेक्षा करतो?

*१. आपण श्रोते असतो तर काय अपेक्षा केली असती? - समोरच्यांच्या दृष्टीकोनाचा विचार करा*

*२. येणाऱ्या श्रोत्यासाठी आपण एक कर्तृत्ववान व्यक्ती आहोत. अशावेळी आपल्याबद्दलची प्रतिमा द्विगुणीत करायची जबाबदारी आपलीच असते.*

*३. आपण आपल्याबद्दल बोलतो तेव्हा श्रोता भारावून जातो. कित्येकवेळा त्याला आपल्यात त्याचीच छबी दिसू लागते. तो तुमच्याशी एकरूप होऊ पाहतो. अशावेळी मी काय बोलावे याचे भान मला असणे अनिवार्य आहे हे विसरून चालत नाही.*

*४. श्रोता त्याला जे ऐकायचंय ते ऐकायला आला असतो. मग तुम्हाला जे सांगायचंय ते कसे मांडाल?*

*५. श्रोत्याच्या मनात अनेक प्रश्न असतात. तुमचे बोलणे ऐकताना त्या प्रश्नांच्या उत्तराची मनोमन तो जुळवाजुळव करीत असतो. कित्येकवेळा त्याचे तुमच्याशी दुमत होते किंवा त्याचे मत तुमच्या मताशी जुळते. तेव्हा 'तुम्ही खूप छान बोललात, खूप चांगली माहिती दिली' असे त्याला वाटते.*

*६. काही श्रोते तुमचे चाहते होऊ लागतात आणि अशावेळी आपण काय बोलतोय याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. ते तुमचे बोलणे ऐकण्यासाठी पुन्हा पुन्हा येतील. मागील वेळी तुम्ही हा मुद्दा बोललात, यावेळी नाही आणि अशा हजार गोष्टींचा ताळमेळ जुळविण्याचा उगाच प्रयत्न करतील. आपले बोलणे किती मुद्देसूद आणि नाविन्यपूर्ण हवे याची आपल्यालाच कल्पना येत जाते.*


*७. श्रोत्यांना समजून घेणे आपल्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. पण त्यांना गृहीत धरून कुठल्याही आधाराविना वक्तव्य करणे, माहिती देणे, चुकीचा संदेश देणे म्हणजेच आपली स्वतःची प्रतिमा पणाला लावणे असेच म्हणता येईल.*

### एक यशस्वी उद्योजक एक यशस्वी वक्ता का होऊ शकत नाही?

ही काळाची गरज आहे! आपणच आपल्या व्यवसायाचे 'ब्रँड अम्बेसेडर' असतो. अशावेळी विविध चर्चासत्र, कॉन्फरन्सेस, सेमिनार्स मध्ये आपल्याला आपल्या व्यवसायाबद्दल बोलण्याची संधी येते. व्यवसाय उत्तम पद्धतीने मांडताना फक्त आकडेमोड सांगून जिंकणारे खुपसे उद्योजक आहेत. आपल्या बोलण्यात नाविन्य काय आहे? समोरचा श्रोता हासुद्धा तुमच्यासारखा उद्योजक असेल अशावेळी ही आकडेवारी आणि मांडणी सारखीच नाही का होत? 'एकाच माळेचे मणी' होण्यापेक्षा 'मी त्या माळेचा तनमणी' का होऊ नये? असे काय करता येईल ज्यामुळे मी केलेले भाषण, प्रेझेन्टेशन अप्रतिम आणि अविस्मरणीय होईल?

### सुरवात आपल्यापासूनच:

एक उद्योजक म्हणून हा व्यवसाय उभा करून वाढविण्यासाठी जितकी मेहनत मी घेतली आहे तितकीच मी स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी घेईन हे ब्रीदवाक्य आपल्या मनात कोरून ठेवा.



### काही मुद्दे, स्वतःसाठी:

स्वतःचे बोलणे रेकॉर्ड करा. – हल्ली प्रत्येकाकडे स्मार्ट फोन आहेत. एखाद्या ठिकाणी आपले भाषण, प्रेझेन्टेशन होत आहे तिथे आपल्या मोबाईलवर स्वतःला रेकॉर्ड करा. ही अगदीच सहज होऊ शकणारी गोष्ट आहे. यामुळे आपण समोरच्या श्रोत्यांपर्यंत कसे पोहोचतो, आपला आवाज कसा ऐकू येतो, आपण स्पष्ट बोलतो का? मुद्दे नीट पटवून देऊ शकतो का? आपल्याला आपलेच बोलणे पटतेय का? अशा अनेक बाबींवर आपण आपलेच अवलोकन करू शकतो.

अगदी परखडपणे स्वतःचे अवलोकन करणे गरजेचे आहे. हे रेकोर्डिंग लगेच ऐकू नका. एक दोन दिवसांनी ऐका. परत आठवड्याभराने ऐका. स्वतःच्याच अनेक गोष्टी नव्याने आपल्यासमोर येत जातात. त्यानुसार काय सुधारणा कराव्या हे ठरवता येते.

वाचन वाढवा – आपण नवोदित उद्योजक असताना अनेकांची भाषणे ऐकण्याचा योग येतो. अनेक वक्ते, सुभाषिते, थोरामोठ्यांचे विचार, सुविचार, एखादी ओवी, अभंग, शायरी, गोष्ट या साऱ्या माध्यमांतून आपल्यापुढे त्यांचे मुद्दे मांडताना ऐकून आपल्याला त्यांच्या ज्ञानाचे, वक्तृत्वाचे कौतुक वाटते. पण स्वत:ला मात्र यासाठी वेळच मिळत नाही ही सबब देऊन आपण स्वत:च स्वत:चे नुकसान करतो.

प्रत्येक उद्योजकाने स्वत:ला उप टू डेट ठेवणे आणि दिवसभरात किमान १० मिनिटे स्वत:साठी काढून वाचन करणे यामुळे आपल्या वक्तृत्वाला अनोखी धार मिळते. अनेक उदाहरणे देता येतात पण ती किती द्यावी आणि कुठे द्यावी याचेही भान ठेवणे गरजेचे आहे.

इतरांची भाषणे ऐका – आज इंटरनेटमुळे वैयात्तिक विकासाच्या दृष्टीने एक अप्रतिम माध्यम आपले स्वागत करीत आहे. इंटरनेटवर युट्युबसोबतच अनेक वेबसाईट आहेत जसे टेड टॉक, इ. जे विविध उद्योजकांना बोलवून आपले मुद्दे मांडण्याची संधी देते. विविध क्षेत्रातील उद्योजक आणि वक्ते त्यावर आपली मते मांडतात. ते आपले मुद्दे कसे मांडतात याचा अभ्यास करा.

आपला आवडता नेता, अभिनेता, वक्ता यांची भाषणे ऐका. त्यांचे अनुकरण करायचे नाही पण ते किती प्रभावीपणे आपले विषय मांडतात याचा अभ्यास करा. किमान दहा जणांचे भाषण ऐकून मग आपली एक खास शैली तयार करा जी फक्त तुमची असेल.

आवाजाचे प्रशिक्षण घ्या – आज अनेक ठिकाणी तुम्हाला व्हॉईस प्रशिक्षण वर्ग सापडतील. त्यात तुम्हाला वैयात्तिकरित्या व्हॉईस ट्रेनिंग देणारे ट्रेनर्स असतात. आपल्या आवाजाचा पोत, पट्टी, स्वर, चढ उतार, उच्चार, सुस्पष्टता, अक्सेंट अशा अनेक बाबींवर काम केले जाते. व्हॉईस प्रशिक्षक आपल्याला आपल्या आवाजातील आणि संभाषणातील त्रुटी सांगून त्या दूर करण्यासाठी मदत करतात.

स्ट्रेस आणि पॉज हे प्रत्येक संभाषणात महत्वाचे असते. ते कुठे, कसे आणि किती प्रमाणात



वापरावे याचेही प्रशिक्षण ते देतील. एकंदरीत आपला वक्ता होण्याच्या प्रवासात आपण जे बोलतो ते योग्य पद्धतीने बोलतो याची खबरदारी आणि खात्री करून घेण्यासाठीच हे प्रशिक्षण घ्यावे.

**नोटस काढा** – व्यवसायाबद्दल सांगण्यासारखे खूप असते पण कित्येकवेळा महत्त्वाचे सांगायचे राहून जाते. अशावेळी नोट्स काढणे गरजेचे आहे. आपल्याला आज सांगितले आणि उद्याच बोलायला उभं राहायचंय असं फार क्वचित होतं. मोठ्या उद्योजकांच्या बाबतीत तर महिना, दीड महिना आधीच कार्यक्रमाची तारीख दिली जाते. अशावेळी आपल्या हातात भरपूर वेळ असतो. आपण काय बोलणार आहोत, येणारा श्रोतावर्ग कोण असेल, आपल्याकडे किती वेळ आहे, कुठल्या भाषेत बोलायचे आहे? या साऱ्याचा आढावा घेऊन मग नोट्स काढायला सुरवात करावी. यामुळेच आपल्याला वेळेचे नियोजन करून एक उत्कृष्ट भाषण तयार करता येते.

**आपली प्रतिमा** – एखाद्या कार्यक्रमाला वक्ता म्हणून जातांना फॉर्मल कपडे घालणे महत्त्वाचे आहे खरे. पण कित्येक उद्योजक सदरा घालणेही पसंत करतात. उद्योजिका असतील तर साडी पेक्षाही सलवारकमीज घालणे पसंत करतात.

आपण काय घालतोय याचे मात्र भान असणे गरजेचे आहे. व्यक्तिमत्व विकास शिबिरात आम्ही सांगतो, पहिल्या ७ सेकंदात श्रोता तुमच्याबद्दलची प्रतिमा आपल्या मनात करतो. हे क्षण तुमच्यासाठी खूप महत्त्वाचे असतात. त्यामुळेच जे काही कपडे आपण निवडतो ते चांगले, आपल्याबद्दलचा आदर वाढवतील आणि एकंदरीतच आपले व्यक्तिमत्व प्रभावी दिसेल असे निवडावे. चेहरा आनंदी, हसरा, बोलके डोळे आणि गोड वाणी आपल्या व्यक्तिमत्वाची छाप पाडण्यात महत्त्वपूर्ण ठरतात.

**नवनवीन माणसे जोडा** – माणसे जोडण्याचे खूप मोठे कौशल्य आपल्याकडे असले पाहिजे. एक उद्योजक म्हणून आपण माणसे जोडतो. मग ते आपले प्रतीस्पर्धीसुद्धा असू शकतात. थोडक्यात सांगायचे झाले तर एक उद्योजक आणि एक वक्ता म्हणून तुम्ही जेव्हा उभे राहाल तेव्हा तुमच्या प्रतिस्पर्ध्यांनीसुद्धा तुमचा आदर करावा इतकी प्रतिभा आणि कर्तृत्व अंगी बाणविले पाहिजे.



**'मी' 'अहम' 'अहंकार':**

मला माझ्याबद्दल बोलायचे असते तेव्हा 'मी' हा शब्द खूप वेळा येतो. श्रोते प्रतिसाद देत असतील तर आपल्याला अधिक जोम येऊन आपण किंचित किंवा संपूर्णपणे अहंकाराच्या अधीन जातो आणि ते आपल्यालाही कळत नाही किंवा कळूनही वळत नाही.

'मी केले म्हणताना माझ्यासोबत अविरत झटणारे माझे कर्मचारी, कुटुंब यांचाही मोलाचा वाटा होता'. 'मी सांगतो हे असेच आहे' पेक्षाही 'मला असे वाटते, तुम्हाला पटते का पहा' अशी वाक्ये प्रभावी ठरतात. कित्येकदा वक्ते आपलेच म्हणणे बरोबर आहे आणि इतरांचे चुकीचे. मी सांगितली तीच पूर्वदिशा हा अट्टाहास करतात. काहीवेळा ते बरोबर असले तरी श्रोत्यांवर आपण आपली मते लादू शकत नाही हे भान असणे खूप गरजेचे आहे.

आपले श्रेष्ठत्व सिद्ध करतानाच इतर कसे चुकीचे हे सांगणारे, आपल्या प्रतीस्पर्ध्यांविषयी गैर बोलणारे, एखाद्याचे नाव घेऊन अपशब्द काढणारे असे वक्तेही खूप आहेत. पण जिथे आपण इतरांचा पाणउतारा करतो तिथे आपण आपलेच बुरुज किती ढासळलेले आहेत हे दाखवत असतो. आपले श्रेष्ठत्व हे आपल्या मेहनतीचे आणि कर्तृत्वाचे पाहिजे. इतरांच्या यशाची ईर्षा, त्यांच्या अपयशाची खिल्ली उडवणे हे आपल्यातील कमकुवतपणाचे लक्षण मानले जाते.

कधी आपला अहंकार दुखावला जातो. ज्याचे उत्तर आपल्याला माहित नाही असा एखादा प्रश्न श्रोत्याने विचारला तरी आपण काहीतरी उत्तर देतो, प्रश्नच नीट समजून घेत नाही, श्रोता बोलायच्या आतच त्याला शांत केले जाते अशा अनेक गोष्टी घडू शकतात. अशा वेळी जुजबी किंवा चुकीचे उत्तर देण्यापेक्षा उत्तर माहित नसल्याची प्रामाणिकपणे कबुली देणे केव्हाही चांगले. यामुळे आपली प्रतिमा खालावत नाही तर अधिक उंचावते.

त्याचप्रमाणे बोलताना शब्द जपून वापरावे. भावनेच्या भरात, खूप मोठ्या श्रोतावर्गासमोर किंवा एखाद्या सभेत आपण आश्वासन देतो, मदत करण्याचे किंवा भेटायला या आपण बोलू, मी हे करून देईन, तुमचं काम होईल वगैरे. पण आपल्या व्यस्त दिनक्रमात आपण त्यांना खरच वेळ देऊ शकतो का? हे जर तुम्हाला खरोखरीच पटणार असेल, करता येणारं असेल तर खुशाल आश्वासन द्यावे. आश्वासन देऊन ते पुरे करता नाही आले तर हाच श्रोतावर्ग तुमची बदनामी करण्यास मागेपुढे पाहणार नाही याचे भान असणे गरजेचे.

मी असे केले म्हणतानाही तुम्हीही याच मार्गाचा अवलंब करून यश मिळवा असा पायंडा रचणे किती योग्य आहे याचा विचार जरूर व्हावा. आपण ज्या परिस्थितीत उद्योग सुरु केला, तेव्हाचा काळ, आताचा काळ, शासकीय सुविधा, स्पर्धा या साऱ्यांचा सारासार विचार करून यातले काय घ्यायचे हे तुम्ही ठरवा असे धोरण असणे चांगले नाही का? आपण सांगितलेलाच मार्ग अवलंबून जर एखाद्याचे नुकसान झाले तर त्याचेही खापर तुमच्या

माथी येऊ शकते. मार्ग सांगण्यापेक्षाही दिशा दाखवावी, चालणे न चालणे हे प्रत्येक श्रोत्याने ठरवावे हे खरे.

**जबाबदारी आपल्यावरच:**

मी एक यशस्वी उद्योजक. आज माझ्यावर वक्ता म्हणून माझे मत मांडण्याची महत्वाची जबाबदारी आली आहे. अशावेळी मी पूर्णतः विचार करून माझे भाषण तयार करीन. माझ्या भाषणात कुठेही अहंपणा जाणवणार नाही याची मी खबरदारी घेईन. माझ्या वक्तव्यात समोरच्या श्रोत्याला जास्तीत जास्त फायदा झाला पाहिजे आणि त्यातून एक सुजाण, जबाबदार, कर्तृत्ववान उद्योजक घडला पाहिजे. समाजाप्रती, देशाप्रती आणि जगाप्रती त्याची नजर आदरयुक्त असली पाहिजे.

एक यशस्वी आणि कर्तृत्ववान उद्योजक म्हणून आपण समाजापुढे उभे राहतो तेव्हा आपण अनेक होतकरू उद्योजकांना, प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा देत असतो. ती प्रेरणा मेहनतीने आणि आपल्या कर्तृत्वाने मोठे होण्याची स्वप्नं देणारी असावीत याचे भान ठेवणे खूप गरजेचे आहे. इझी मनीच्या जमान्यात झटपट पैसा कमवून झटपट जमिनीवर येणारे अनेक व्यावसायिक दिसतात. पण आपण जे बोलतोय, जे देऊ करतोय त्यातून एक सक्षम उद्योग उभा राहावा, एक आदर्श उद्योजक घडावा आणि त्यातूनच देशाचा आणि भावी पिढीचा सर्वांगीण विकास व्हावा हे उत्तुंग ध्येय घेऊनच एक यशस्वी, कर्तृत्ववान आणि सामाजिक बांधिलकी जपणारा सजग, प्रभावी उद्योजक, वक्ता म्हणून आपण समोर उभे राहावे.. शेवटी एक खरे.. समाजाने आपल्याला कितीही मोठे ठरविले तरी आपण स्वत:ला फसवू शकत नाही हेच अंतिम सत्य...

म्हणूनच,



**वक्ता म्हणून तयारी आणि प्रेझेन्टेशन:**

१. *ज्या दिवशी आपल्याला बोलायचे आहे त्यादिवशी सकाळपासून त्या विषयाबद्दलचा विचार, शब्दांची जुळवाजुळव, काढलेले नोट्स पुन्हा वाचणे, उदाहरणे पुन्हा वाचणे, वृत्तपत्रात आलेल्या काही विशेष लेखांची नोंद घेणे*

२. *आपली मुद्रा प्रसन्न, मनात सकारात्मक विचार आणि कार्यक्रमाची मानसिक तयारी.*

३. *आपल्या आवाजाचा रियाझ करणे गरजेचे आहे.*

४. *ज्या संस्थेच्या कार्यक्रमासाठी आपण वक्ता म्हणून जातो आहोत त्या संस्थेचे नाव, त्यांचे कार्य, त्यांच्या महत्वाच्या पदाधिकाऱ्यांची नवे आधीच जाणून घेऊन तयार असणे. कित्येकवेळा कार्यक्रमात गेल्यानंतर 'आज या ठिकाणी या.....' संस्थेचे नाव लक्षात नसल्यामुळे मागे वळून बोर्डवर किंवा बेनरवर नाव पाहून पुन्हा 'या संस्थेने'अशी सुरुवात करणे हा चुकीचा पायंडा पडला आहे. यामुळे आपण या संस्थेबद्दल माहिती न घेता आलोय आणि आपण किती बेफिकीर आहोत असे दिसते.*

५. *वक्तशीरपणा खूप महत्वाचा आहे. आपण आपल्या व्यस्त कामातुनही वेळ काढून 'उदार' मनाने आलोय हे दाखविण्यासाठी उशिरा येण्याची गरज नाही. श्रोते वेळेवर येत नाहीत मग आपण का वेळेवर जावे? दुर्दैवाने भारतात वक्तशीरपणा पाळणारे फार फार कमी लोक आहेत. कार्यक्रमाच्या ठिकाणी १० मिनिटे आधी पोहचून संस्थेच्या पदाधिकार्यांशी चर्चा करणे, माईक चेक करणे आणि त्या वातावरणात किमान एक १० मिनिटे स्वतःला कंफर्टेबल करणे खूप गरजेचे असते.*

६. *वेळेचे भान ठेवणे. आपल्याला किती मिनिटे बोलायला दिली आहेत याचे भान ठेवा. खुपसे उद्योजक बोलण्याच्या तंद्रीत पुढचा उद्योजकही थांबला आहे हे विसरून जातात. आपल्याला दिलेल्या वेळेतच सगळ्या गोष्टी मुद्देसूद मांडता आल्या पाहिजेत. वेळेचे हे नियोजन फार महत्वाचे आहे. त्यामुळेच आपण मोजके आणि नेमके बोलतो. कुणाला आपल्याला चिठ्ठी पाठवावी लागू नये याचे भान ठेवा. सगळ्यांनाच बोलायचे असते आणि ऐकायचे असते. थोडं पुढच्या भाषणासाठी राखून ठेवा. लोक पुन्हा ऐकायला येतीलच.*

७. *प्रश्नोत्तरे हा कित्येकवेळा कार्यक्रमाचा महत्वाचा घटक असतो. अशावेळी श्रोते अनेक प्रश्न विचारतात. ते नीट समजून घेऊन, त्यांचा रोख समजून घेऊन मगच उत्तरे देणे. उत्तर देताना शब्दांचे भान असणे गरजेचे आहे.*

८. *काही वेळेला 'मला इथे का बोलावलं मला माहित नाही', 'हा विषय माझा नाही', 'मी या विषयावर काय बोलणार' असे तिथे जाऊन बोलण्यापेक्षा आधीच संस्थेला सांगावे की हे विषय तुमचे नाहीत. अशा वक्तव्यामुळे, 'आम्हाला बळजबरी इथे बोलावलं' किंवा 'मला किती महत्व देतात' असे काहीसे चित्र आपण बनवितो आणि आपल्या प्रतिमेला अहंकाराची झालर लागते.*

९. *काहीवेळा आलेला श्रोत्यांचा त्या विषयाचा सखोल अभ्यास असतो. अशावेळी ते शांतपणे आपले भाषण ऐकतात. जुजबी माहितीवर आधारित भाषण लगेच ओळखतात आणि तुम्हाला या विषयाची माहिती नाही असे बोलूनही दाखवतात तेव्हा आपल्या विषयाचा सखोल अभ्यास असणे अनिवार्य आहे.*

विचारूनी बोले विवंचुनी चाले। तयाचेनि संतप्त ते ही निवाले ।।
बरे शोधिल्यावीण बोलों नको हो । जनी बोलणें शुद्ध नेमस्त राहो।।

समर्थ रामदासांनी त्यांच्या मनाच्या श्लोकातील या महत्वाच्या श्लोकाचा अर्थ किती समर्पकपणे आपणा सर्वांस सांगितला आहे:

जो मनुष्य नेहमी विचारपूर्वक बोलतो आणि विचारपूर्वक वागतो, त्या मनुष्याच्या सहवासाने त्रीतापाने त्रस्त झालेले लोकही संतुष्ट होतात. म्हणून सर्व तऱ्हेने विचार करून शोध घेतल्याशिवाय बोलू नये आणि आपले बोलणे नेहमी शुद्ध व शिस्तीचे असावे...